# औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या गुरुवार दि. ३०.८.९० रोजी दुपारी ३.०० वाजता झालेल्या ५३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] श्री. ए. एम. महाजन | :- | उप सभापती/औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. बी. एन. माखिजा | :- | सदस्य |
| ३] श्री. मुन्शीलाल गौतम | :- | सदस्य |
| ४] श्री. डी. एम. गोडघाटे | :- | सदस्य |

मंडळाचे मा. सभापती त्यांचे मुख्यालयाहून सभेसाठी यावयास निघाले होते, परंतू रेल्वे ६ तास लेट झाल्याने ते पुर्व सुचनेने अनुपस्थित होते. म्हणून त्यांच्या ऐवजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारावे अशी विनंती उप सभापती यांनी करुन इतर सदस्यांनी अनुमोदन दिल्यामुळे मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचे अध्यक्षपद स्विकारुन सभेचे कामकाज सुरु केले.

विभागीय आयुक्त, नासिक विभाग हे फोनवर पुर्व सुचना देवून अनुपस्थित होते.

प्रशासक, महानगरपालिका, नासिक हे बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

विषय क्र. १:- दिनांक २७.७.९० रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

मंडळाच्या दिनांक २७.७.१९९० रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करतांना सदरच्या बैठकीत विषय क्र. ४, ठराव क्र. २८६ वर परत चर्चा होऊन मा. विभागीय आयुक्त व सभेचे सभापती, यांनी असे सांगितले की, मंडळाच्या जागेवरील अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी रोजंदारीवर मजूर लावावेत व अनधिकृत बांधकामे पाडण्याची कार्यवाही त्वरीत करावी व त्यासाठी लागणा-या पोलीस बळाची तथा यंत्रणेची मदत घ्यावी.

त्याच प्रमाणे विषय क्र. ७, ठराव क्र. २८९ वर परत चर्चा होऊन असा निर्णय घेतला की, एकनाथनगर येथे प्रस्तावित उच्च उत्पन्न गटा-अंतर्गत १० गाळे व ४ दुकाने या योजनेचे बांधकाम नियोजित जागेवरच पूर्ण करण्यांत यावे. झोपडपट्टीतील रहिवासी सदर बांधकामामुळे त्यांचे वहिवाटीत असलेला रस्ता बंद होणार असल्याने बांधकामास विरोध करीत आहेत. उप सभापतींनी माहिती दिली की, सदर झोपडपट्टी वासियांसाठी असलेल्या रस्त्यावर अतिक्रमण करून एक मजली इमारत बांधण्यांत आली आहे. यावर असा निर्णय घेण्यांत आला की, सदरचे अतिक्रमण पाडून रस्ता मोकळा करण्यांत यावा. त्याच प्रमाणे नियोजित इमारत बांधकाम पूर्ण करण्याचे दृष्टीने झोपडपट्टीचे बाजुने भिंत बांधून मंडळाचे जागेचे हद्यीतून असलेली रस्त्याची वहिवाट बंद करण्यांत येवून बांधकाम सुरु करण्याची कार्यवाही त्वरीत करावी व असाही निर्णय घेतला की, सदरच्या बांधकामास जर बाजुच्या लोकांनी आक्षेप किंवा अडथळा निर्माण केल्यास, पोलीस यंत्रणेची मदत घ्यावी. ह्यासाठी आवश्यक ते प्रयत्न मंडळाच्या कार्यकारी अभियंता व इतर अधिका-यांनी त्वरीत करावेत.

ठराव क्र. २९२:

दिनांक २७.७.१९९० रोजी झालेल्या ५२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर सविस्तर चर्चा होऊन ५२ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत कायम करण्यांत आले.

विषय क्र. २:- औरंगाबाद गृहनिर्माण मंडळाने, महावीर स्तंभाजवळ, देवगिरी कॉलेज जवळ, सिडको एन-६ व गारखेडा औरंगाबाद येथे बांधलेल्या विविध गटातील गाळ्यांच्या पाणीपुरवठ्या बाबत.

या बाब टिप्पणीवर चर्चा करतांना विभागीय आयुक्त व सभापती यांनी महानगरपालिकेचे आयुक्त यांना सदरच्या गृहनिर्माण योजने अंतर्गत बांधलेल्या गाळ्यांना शक्य तितक्या लवकर पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था करावी असे सुचविले. त्यावर महानगरपालिका, आयुक्त यांनी आश्वासन दिले की, महावीर स्तंभाजवळील [गृहनिर्माण भवनाजवळील

गाळयास] पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था डिसेंबर ९० अखेर करण्यांत येईल व हा पाणीपुरवठा कोटला कॉलनीमधील महानगरपालिकेच्या टाकीमधून पुष्पनगरीकडे येणा-या पाणीपुरवठा नलीकेमधून देण्यांत येईल. हया सभेला उपस्थित असलेले औरंगाबाद महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता श्री. सोनी यांनी हे मान्य केले. तोपर्यंत गृहनिर्माण मंडळाने वसाहती अंतर्गत पाईप लाईनचे काम पूर्ण करावे असे ठरले.

देवगिरी कॉलिज, सिडको एन-६ व गारखेडा येथील गृहनिर्माण योजने अंतर्गत गाळयांना पाणीपुरवठा हा मार्च, १९९१ पावेतो देण्याची व्यवस्था करण्यांत येईल असे महानगरपालिका आयुक्त यांनी आश्वासन दिले.

गृहनिर्माण मंडळाच्या योजनेस पाणीपुरवठा करणे संबंधी उद्भवत असलेल्या अडचणी बाबत, महानगरपालिका आयुक्तांनी विभागीय आयुक्तांना एक टिप्पणी पाठवावी असे सभापतींनी सुचविले.

ठराव क्र. २९३:

वरील योजनेस लागणा-या पाणीपुरवठयासाठी वसाहती अंतर्गत पाईपलाईन्स टाकण्याचे काम कार्यकारी अभियंता, गृहनिर्माण मंडळ यांनी पूर्ण करावे व औरंगाबाद महानगरपालिकेने १९२ मध्यम उत्पन्न गटातील गाळयांना डिसेंबर, ९० पर्यंत व देवगिरी कॉलिज, सिडको एन-६ आणि गारखेडा येथील गृहनिर्माण योजने अंतर्गत गाळयांना मार्च ९१ पर्यंत पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी असे सर्वानुमते ठरले.

विषय क्र. ३:- महाराष्ट्रात विपूल प्रमाणात घरबांधणी करण्यासाठी व उत्तम दर्जाचे बांधकामासाठी व तद्नुश्य गरजा भागविण्यासाठी नव्या धोरणाचा शोध.

शासन निर्णय क्र. एचएसजी-३३८४/[६४]/का-६ दिनांक ११. २. १९८४...........
मे. बी. जी. शिर्के आणि कं. यांना काम देवू करणे बाबत आणि मे. सिपोरेक्स इंडिया लिमिटेडचे [समपुल्य भाग] शेअर्स खरेदी करणे बाबत.

ठराव क्र. २९४:

विभागीय आयुक्त व सभेचे सभापती, यांनी असे सुचविले की, मंडळाचे सभापती बैठकीस हजर नसल्याने, हा विषय मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यांत यावा.

विषय क्र. ४:- गाळेधारकांना पुरविण्यांत येणा-या अभिन्यासाच्या आणि घराच्या नकाशाच्या निल प्रतीच्या [ BLUE PRINTS ] सुधारीत दरास मान्यता देणे बाबत.

ठराव क्र. २९५:

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने निर्णय घेतला की, गाळेधारकास पुरविण्यांत येणा-या अभिन्यासाच्या आणि घराच्या नकाशाच्या निल प्रती [ BLUE PRINTS] साठी लागणा-या सामुग्रीचे वाढलेले दर व त्यासाठी लागणारे मनुष्यबळ [ MAN-POWER ] विचारात घेता गाळेधारकास पुरविण्यांत येणा-या अभिन्यासाच्या आणि घराच्या नकाशाच्या निल प्रतीचे [ BLUE PRINTS ] दर वाढविण्यांत यावेत. [१] प्लॅन व बिल्डींग प्लॅनसाठी रु. ५०/- व [२] लिजडिड व सेलडिड सोबत जोडावयाचा प्लॅनसाठी रु. २०/- अशा नविन दरास मंडळाने मान्यता दिली. यापुढे गाळेधारकास पुरविण्यांत येणा-या नकाशाचे शुल्क वरील वाढीव दराने वसुल करण्यांत यावे.

विषय क्र. ५:- मालेगांव नगरपालिकेने सन १९८७ मध्ये गृहनिर्माण मंडळाच्या विनंतीवरुन संडासाच्या केलेल्या दुरुस्तीचे देयके मंजूर करणे बाबत.

ठराव क्र. २९६:

या टिप्पणीवर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने मालेगांव, नगरपालिकेने ए.पी.ब्लॉकसच्या दुरुस्तीसाठी केलेल्या रु. २,०९,६५८/- च्या केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती करण्यास मान्यता दिली. परंतू अदायी करण्यापुर्वी मंडळाच्या अधिका-यांनी मालेगांवला भेट देऊन मालेगांव

येथील १००० खोलीच्या ए.पी.ब्लॉक्सच्या दुरुस्तीचे जे काम मालेगांव नगरपालिकेने केलेले आहे त्याचे लेखा परिक्षण करुन झालेला खर्च नियमा-प्रमाणे बरोबर असल्याची खात्री करण्यांत यावी. तसेच सदर अदायीसाठी मंजूर अंदाज पत्रकात तरतूद नसल्याने सुधारीत अंदाज पत्रकात तरतूद करण्यांत यावी.

विषय क्र. ६:- हर्सूल[औरंगाबाद] येथे महानगरपालिकेकडून ताबा मिळालेल्या [सर्व्हे क्र. २१७ [भाग] या जमिनीवर सुरु केलेल्या २२८ अल्प उत्पन्न गटा अंतर्गत गाळयाच्या बांधकामाच्या योजनेत करावयास लागलेल्या बदलामुळे उत्पन्न झालेल्या स्थितीबाबत.

उपसभापती हयांनी सांगितले की, सदर बांधकामात आलेल्या अडचणीमुळे ठेकेदारास संपूर्ण २२८ गाळयाचे मार्कआऊट वेळेवर देणे शक्य झाले नाही. त्यामुळे ठेकेदाराने उर्वरित ५४ गाळे बांधण्यास करारपत्राचे अट क्र. १४ चा आधार घेऊन काम करण्यास नकार दिला. यावर सविस्तर चर्चा होऊन विभागीय आयुक्त व सभेचे सभापती यांनी असे सुचविले की, उर्वरित ५४ गाळयासाठी सर्वसाधारण जनतेकडून प्राप्त झालेल्या १७७ अर्जाची सोडत काढून, यशस्वी लाभधारकांना गाळयाऐवजी सुधारीत भूखंड देता येईल काय ? यावर महानगरपालिका, आयुक्त यांनी असे सांगितले की, हर्सूल येथील जमिन ही गृहनिर्माण मंडळास फक्त घरे बांधण्यासाठीच दिलेली असल्यामुळे सदरच्या जागेवर फक्त घरेच बांधावीत व विकसित भूखंड वाटप करु नयेत. यावर मंडळाने असा निर्णय घेतला की, उर्वरित जमिनीवर ५४ घराचे बांधकाम करावे व यशस्वी लाभधारकांना फक्त घरेच बांधून द्यावीत. परंतू सध्या शेडयूल ऑफ रेटस् विचारात घेता जर घराची किंमत वाढत असेल तर सदर वाढीव किंमतीस लाभधारकांची अगोदर [ In Advance ] लेखी संमती घ्यावी व ५४ गाळयाचे बांधकाम पूर्ण करावे. ५४ घराचे अंदाजपत्रक [ Estimate ] सध्याच्या शेडयूल ऑफ रेटस् प्रमाणे तयार करुन, प्राधिकरणाकडे सविस्तर प्रस्ताव मंजूरीसाठी पाठवावा.

ठराव क्र. २९७:

हया बाबत मंडळाने खालील प्रमाणे ठराव मंजूर केला.

१] २२८ पैकी बांधकाम झालेल्या १६३ गाळयापैकी महानगरपालिकेचे सफाई कामगारांना ११२ गाळे देण्यांत यावेत उर्वरित ५१ गाळे सर्वसाधारण जनतेकडून प्राप्त झालेल्या अर्जाची सोडत काढून वाटप करण्यांत यावेत.

२] उर्वरित जागेवर ५४ गाळयांच्या बांधकामासाठी नियमाप्रमाणे त्वरीत कार्यवाही करावी.

विषय क्र. ७:- नांदेड येथील "खुदवईनगर" या झोपडपट्टी-
-तील सुधारकामांस प्रशासकीय मान्यता
देणे बाबत.

या बाबत उप सभापती यांनी मंडळाला माहिती दिली की, नांदेड नगरपालिकेने "खुदवईनगर" या झोपडपट्टीत गलिच्छ वस्ती सुधार कामाचा कार्यक्रम खालील प्रमाणे आखलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १] स्ट्रिट लाईट | :- | रु. १,६५,०००/- |
| २] रस्ते व पायवाट | :- | रु. ६,२३,९३५/- |
| ३] पाण्याचे नळ | :- | रु. ५,५८,५२०/- |
| ४] गटारे | :- | रु. ३,५०,१७०/- |
| ५] शौचालय[भूमीगत गटारी] | :- | रु. १५,२७,३३४/- |

उपसभापतींनी सभेला अशी माहिती दिली की, या कार्यक्रमा अंतर्गत संडास पुरविण्याच्या बाबीऐवजी नगरपरिषदेने या वसाहतीत ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी रु. १५,२७,३३४/- चे अंदाज पत्रक सादर केलेले आहे. तसेच नगरपरिषदेने त्यांचे पत्र क्र. ५४५ दिनांक २२.८.९० अन्वये कळविलेले आहे की, खुदवईनगर ही घोषित झोपडपट्टी खाजगी जमिनीवर असून या झोपडपट्टीत शौचालये बांधण्यास जागा उपलब्ध नाही. सदर वसाहतीमधील रहिवाशांनी स्वत:चे शौचालय बांधून घेण्याबाबत नगरपालिकेस हमी दिलेली आहे. त्यामुळे नगरपरिषदेने भूमिगत गटार योजना प्रस्तावित केलेली आहे. यावर मंडळाच्या सदस्यांनी असे मत व्यक्त केले की,

....

[अ] भूमिगत गटारे बांधणे हा कार्यक्रम या योजने अंतर्गत राबविता येणार नाही. कारण भूमिगत गटार योजना राबविणे हे नगरपरिषदेने त्यांच्या निधीतून करावयाचे काम आहे.

[ब] वरील झोपडपट्टीत सुधारणा कार्यक्रम राबवितांना शक्यतो प्रत्येक झोपडपट्टीधारकास वैयक्तीक शौचालय पुरविण्याचा प्राधान्याने विचार व्हावा. व वैयक्तीक शौचालय पुरविण्यासाठी इतर खर्च कसा कमी करता येईल हे देखील पहावे.

वैयक्तीक शौचालय हे प्रत्येक झोपडपट्टी धारकाने स्वत:च्या खर्चाने केंव्हा बांधावयाचे व नगरपरिषद त्यांना आर्थिक व इतर मदत करणार किंवा कसे याबाबतचे स्पष्टीकरण नगरपरिषदेकडून मागविण्यांत यावे.

क] कांही तांत्रिक अडचणीमुळे वैयक्तीक शौचालयाचा विचार करणे शक्य होत नसल्यास सुलभ शौचालय पुरविण्याचा विचार करावा म्हणजे या शौचालयाच्या देखभाली करिता वेगळी यंत्रणा उभारावी लागणार नाही. व सुलभ शौचालयाच्या पध्दतीनुसार प्रत्येक व्यक्तीला नाममात्र खर्च दर दिवशी देखभालीसाठी करावा लागेल व त्या उत्पन्नामधून देखभाल करणे शक्य होईल. शेवटी मंडळाने असा निर्णय घेतला की, वरील बाबींवर नांदेड नगरपालिकेकडून अभिप्राय मागवावा व सर्व बाबतीत नांदेड नगरपालिकेकडून खुलासा प्राप्त झाल्यावरच या वसाहतीमधील झोपडपट्टी सुधार कार्यक्रमास मानकानुसार प्रशासकीय मान्यता देण्यांत यावी. उपलब्ध निधी ह्या वर्षी कमी असल्याने नगरपालिकेने प्रथम ५० टक्के लोकसंख्येला फायदा मिळेल अशी कामे करावीत व नंतर निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कामे हाती घ्यावीत.

ठराव क्र. २९८:

या बाबतीत सविस्तर चर्चा होऊन शेवटी मंडळाने असा निर्णय घेतला की, संडासाचे बांधकाम नांदेड नगरपालिकेने करण्याच्या अटीवर रु. २६,२५,०००/- च्या "खुदबईनगर" च्या झोपडपट्टी सुधार कामाच्या प्रस्तवास प्रशासकीय मंजूरी मंडळ देत आहे. लाभार्थि योजनेचा फायदा १९९०-९१ च्या उपलब्ध निधीतून देता यावा ह्याकरिता ५० टक्के लोकसंख्येला आवश्यक तेवढीच कामे अगोदर हाती घ्यावीत.

Musical Gents



विषय क्र. ८:- औरंगाबाद मंडळाने ऑक्टोबर ८८ ते जून, ९० पर्यंत घेतलेल्या विविध निर्णयावर मंडळाने केलेल्या कार्यवाहीचा व याबाबतीचा अहवाल.

ठराव क्र. २९९:

या बाब टिप्पणीवर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, ऑक्टोबर, १९८८ ते जून, १९९० पर्यंत औरंगाबाद मंडळाने जे विविध निर्णय घेतलेले आहेत, त्यावर कांही कार्यवाही अपुरी राहीली असल्यास ती त्वरीत पूर्ण करावी व मंडळास तसा अहवाल सादर करावा.

विषय क्र. ९:- आयत्यावेळेचा विषय.

सातपूर नासिक येथील गाळयांच्या हप्त्यापोटी वसुल केलेल्या रक्कमेचा अपहार.

......

या विषया बाबत उपसभापतींनी मंडळाला सातपूर नासिक येथील गाळयांच्या हप्त्यापोटी वसुल केलेल्या रक्कमेच्या झालेल्या [संशयीत] अपहाराची माहिती दिली. सदरील कर्मचा-याविरुध्द रितसर गुन्हा पोलीस स्टेशनला नोंदविल्याची आणि त्याला निलंबीत केल्याची देखील माहिती उपसभापती यांनी मंडळाला दिली.

ठराव क्र. ३००:

या बाब टिप्पणीवर [आयत्यावेळेच्या विषयावर] चर्चा होऊन मंडळाने निर्णय घेतला की, भविष्यात मंडळाच्या कर्मचा-याकडून पैशाचा अपहार टाळण्यासाठी सातपूर नासिक येथील गाळयाचे हप्ते वसुल करण्याचे काम बँकेकडे सोपविण्यांत यावे.

बैठक संपल्यानंतर सभेच्या मा. सभापतीचे आभार मानून सभा संपली.

.........

गट/१५९९०.